शनिवार, दि. २५ एप्रिल २०२६ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक २३५ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४ 8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
MEDICAL
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

अल्पवयीन मातांचे धक्कादायक प्रकरण समोर, आयोगाचा प्रशासनाला कडक इशारा

## ८७ संशयित प्रकरणांची संयुक्त चौकशीचे आदेश

### दोषींवर पोस्को व बालविवाह कायद्यांतर्गत कठोर कारवाईचा निर्देश : डॉ. संजय लाखे



**जालना । प्रतिनिधी -** सोलापूर जिल्ह्यात उघडकीस आलेल्या अल्पवयीन मातांच्या प्रकरणाची राज्य बालहक्क संरक्षण आयोगाने गंभीर दखल घेत प्रशासनाला कडक शब्दांत इशारा दिला आहे. बालविवाह, लैंगिक अत्याचार तसेच सामाजिक-आर्थिक कारणांमुळे अल्पवयीन मुलींना मातृत्वाचा सामना करावा लागत असल्याचे निदर्शनास आले असून, हे बालहक्कांचे गंभीर उल्लंघन असल्याचे आयोगाने स्पष्ट केले आहे. दि. २३ एप्रिल २०२६ रोजी आयोगाचे अध्यक्ष ॲड. संजय विष्णू पुराणिक यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सुनावणीत या प्रकरणाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. यावेळी सदस्य डॉ. संजय लाखे पाटील यांनी माहिती देताना सांगितले की, सदर प्रकरण अत्यंत संवेदनशील व संतापजनक असून, प्रशासनाकडून तातडीने प्रभावी कारवाई होणे अत्यावश्यक आहे. प्राथमिक अहवालानुसार काही प्रकरणांमध्ये बालविवाह व लैंगिक अत्याचाराशी संबंधित बाबी समोर आल्या आहेत. तसेच स्थानिक आरोग्य अधिकारी व संबंधित यंत्रणांकडून कर्तव्यपालनात गंभीर त्रुटी झाल्याचेही निदर्शनास आले आहे.

या पार्श्वभूमीवर आयोगाने जिल्हाधिकाऱ्यांच्या अधिपत्याखाली महिला व बालविकास, आरोग्य, पोलीस आणि शिक्षण विभागाचे संयुक्त विशेष पथक स्थापन करण्याचे आदेश दिले आहेत. या पथकाने ८७ संशयित प्रकरणांची सखोल चौकशी करून संबंधितांची जबाबदारी निश्चित करावी व कठोर कारवाई प्रस्तावित करावी, असे निर्देश देण्यात आले आहेत. आयोगाने प्रशासनाला पुढील १ ते दीड **पान २ वर**

## जालना जिल्ह्यात जनगणना २०२७ चा बिगुल

### १६ मे पासून प्रत्यक्ष गृहसूचीकरण मोहिमेला सुरुवात

**जालना । प्रतिनिधी -** भारताच्या १६ व्या जनगणनेचा (जनगणना २०२७) पहिला टप्पा आता सुरू होत असून, जालना जिल्ह्यात १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रत्यक्ष गृहसूचीकरण व गृहनिर्माण गणना केली जाणार आहे. आधुनिक आणि डिजिटल स्वरूपात होणाऱ्या या जनगणनेत नागरिकांना प्रथमच स्वतःची माहिती ऑनलाइन भरण्याची (स्व-गणना) सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे. जिल्हाधिकारी तथा प्रधान जनगणना अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हाधिकारी कार्यालय येथे आयोजित पत्रकार **पान २ वर**








संपादकीय पान

## वाचन संस्कृती; काळाची गरज

आजचा दिवस संपूर्ण जगात जागतिक पुस्तक दिन म्हणून साजरा केला जातो. विल्यम शेक्सपिअर, मिग्युअल सर्वांटीस, इंका गार्सीलोसो या जगातील ख्यातनाम व्यक्तींचा या दिवशी मृत्यू झाला त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी युनेस्कोने २३ एप्रिल हा दिवस जागतिक पुस्तक दिन म्हणून घोषित केला. हा दिवस पहिल्यांदा २३ एप्रिल १९२३ रोजी स्पेनमधील पुस्तक विक्रेत्यांनी साजरा केला. स्पेनमध्ये मिगेल डे सर्वांटीसच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा करण्यात आला. त्यानंतर १९९५ मध्ये पॅरिसमध्ये युनिस्कोची सर्वसाधारण सभा झाली ज्यात जगभरातील लेखकांना आदर आणि श्रद्धांजली वाहण्यासाठी आणि पुस्तकांमध्ये रस निर्माण करण्यासाठी जागतिक पुस्तक दिन प्रत्येक वर्षी साजरा केला जाईल असा निर्णय घेण्यात आला. वाचन संस्कृतीच्या चर्चेविना पुस्तक दिन साजरा होऊच शकत नाही चला तर मग वाचन संस्कृती विषयी चर्चा करू आणि पुस्तक दिन साजरा करू. आजच्या मोबाईल, इंटरनेट, सोशल मीडियाच्या युगात विद्यार्थ्यांचे वाचन कमी होत चालले आहे. पूर्वी विद्यार्थ्यांमध्ये जशी वाचनाची आवड होती तशी आवड आजच्या विद्यार्थ्यांमध्ये दिसून येत नाही. आजच्या सोशल मीडिया आणि इंटरनेटच्या युगात पुस्तके वाचण्याचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होत चालले आहे. विद्यार्थ्यांमध्ये अवांतर वाचनाची गोडी कमी होत चालली आहे. साहित्य संमेलनामध्ये पुस्तकांची विक्री कमी होऊ लागली आहे. पूर्वी गजबजणारी वाचनालये आता ओस पडू लागली आहेत. ग्रंथालयातील पुस्तके वर्षानुवर्षे एका जागेवरून हलत नाही. आजची पिढी सोशल मीडियाच्या आहारी गेल्याने पुस्तकांपासून दूर होत चालली आहे. सोशल मीडियाच्या आक्रमणामुळे विद्यार्थी अवांतर वाचन विसरत चालले आहेत. सोशल मीडियामुळे वाचन संस्कृती लोप पावत चालली आहे. वाचन संस्कृती टिकवण्यासाठी तसेच विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची आवड निर्माण करण्यासाठी पुस्तक दिनासारख्या उपक्रमांचे आयोजन व्हायला हवे. आजच्या युगात ज्ञान ही खूप मोठी शक्ती आहे याचाच आपल्याला विसर पडला आहे. वाचनामुळे आपल्याला इतिहासाचे ज्ञान, वर्तमानाचे भान आणि भविष्याचा वेध घेता येतो. ज्ञान मिळवण्याचे प्रभावी साधन म्हणजे वाचन. सातत्याने वाचन केल्यावर आपली ग्रहण क्षमता आणि स्मरणशक्ती अधिकाधीक सशक्त होऊन बुद्धिमत्ता अधिकाधीक प्रगल्भ होते त्यातून माणसाच्या विचार पातळीचा चोहोबाजूंनी विकास होतो. वाचनामुळेच माणसाच्या व्यक्तिमत्वाची जडणघडण होते. वाचनामुळे माणूस सुसंस्कृत होतो. चांगलं वाचल्यावर आणि चांगलं ऐकल्यावर आपले विचार विवेकशील व प्रगल्भ होतात, त्यातून आपली मनोभावना शुद्ध होते. आपली भाषा तसेच वक्तृत्व विकसित होते. वाचनामुळे आपले व्यक्तिमत्व बहरते. वाचन ही जीवनाला उन्नत करणारी बाब आहे यामुळे बुद्धीची मशागत होते. माणसाचे जीवन फुलवण्यात वाचनाचा मोठा वाटा असतो त्यामुळे वाचनाचा छंद जोपासून आपले जीवन समृद्ध करायला हवे. मनावरचा ताण कमी करण्यासाठी पुस्तकांच्या सहवासात रमले पाहिजे. चांगल्या पुस्तकांचा, विचारांचा आपल्या जीवनावर सकारात्मक परिणाम होतो आणि आयुष्याकडे पाहण्याचा आपला दृष्टिकोन कायमचा बदलून जातो. पुस्तकांमुळे कमकुवत मनाला धीर मिळतो त्यामुळे निराशेच्या गर्तेत अडकलेला माणूस हत्या, आत्महत्या करण्यापासून परावृत्त होतो. आजकालच्या तरुणांना खूप ताण असतो हा ताण कमी करण्याचे प्रभावी माध्यम म्हणजे वाचन. डॉ बाबासाहेब आंबेडकर नेहमी म्हणत पुस्तकाने अशक्त मस्तक सशक्त होते आणि सशक्त मस्तक कोणासमोरही डोळे झाकून नतमस्तक होत नसते. स्वामी विवेकानंद, महात्मा फुले, डॉ बाबासाहेब आंबेडकर, भगतसिंग यासारख्या महापुरुषांच्या जीवनाला वाचनामुळेच कलाटणी मिळाली. ऐतिहासिक पुस्तकांमुळे वाचकांच्या मनात राष्ट्रनिष्ठा निर्माण होते. कथा कादंबरी यामुळे वाचकांच्या मनात माणुसकीचा भाव जागृत होतो. काव्य वाचनातून आपल्या मनात संवेदनशीलता निर्माण होते. थोरांची चरित्रे वाचून प्रेरणा मिळते. वर्तमानपत्र वाचल्याने सामाजिक जाणिव निर्माण होते. एकूणच वाचनामुळे माणूस सर्वगुणसंपन्न होतो. त्यांच्यात नैतिक मूल्यांची रुजवण होते. आज वाचनाअभावी समाजातून नैतिक मूल्ये हरवत चालली आहे. त्यामुळे नव्या पिढीने पुन्हा एकदा वाचन संस्कृतीकडे वळणे ही काळाची गरज आहे. आपल्या आणि समाजाच्या भल्यासाठी वाचन संस्कृती टिकवायलाच हवी. वाचाल तर वाचाल या उक्तीप्रमाणे तरुण पिढीला वाचवायचे असेल तर त्यांच्यात वाचन संस्कृती रुजवायलाच हवे, त्यासाठी पुस्तक दिनासारखे उपक्रम नक्कीच फायदेशीर ठरतील.

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे, ९९२२५४६२९५.**

## महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेची २६ एप्रिल, २०२६ रोजी निवडणूक

**मुंबई** - वैद्यकीय परिषदेवरील नऊ सदस्यांच्या निवडीकरिता २६ एप्रिल, २०२६ रोजी निवडणुकांचे आयोजन राज्यात करण्यात येणार आहे. या निवडणुकीसाठी ६० उमेदवारांनी अर्ज दाखल केले असून नोंदणीकृत व नोंदणीचे नूतनीकरण केलेले सुमारे १,४०,००० मतदार मतदानाचा हक्क बजावू शकतील. महाराष्ट्र वैद्यकीय परिषद अधिनियम, १९६५ मधील तरतूदीनुसार वैद्यकीय परिषदेतील नऊ सदस्यांची निवड ही राज्यातील नोंदणीकृत व नोंदणीचे नुतनीकरण केलेल्या वैद्यकीय व्यावसायिकांमार्फत करण्यात येते. या निवडणुकीकरीता राज्यातील जिल्ह्याच्या मुख्यालयाच्या ठिकाणी, जिल्हाधिकारी यांच्या नियंत्रणांतर्गत निवडणुकीचे आयोजन करण्यात येणार आहे.

# अनुभवाचे बोल सांगणारा... ‘गाथा एक नाथा’ ॥

ज्येष्ठ लेखक कवी एकनाथ देशमुख यांचा काव्यप्रवास १९७२ पासून ‘‘ओळखी अनोळखी‘‘ या काव्यसंग्रापासून सुरू झाला. त्याला राज्य शासनाचा पुरस्कार मिळाला. काही मासिके, वृत्तपत्रातून कविता प्रसिद्ध होत होत्या. त्यावेळेला ते महाविद्यालय शिक्षण घेत होते. त्यानंतर तब्बल २५ वर्षांनी म्हणजे १९९७ साली ‘‘इंद्रधनू च्या जखमा‘‘ हा काव्यसंग्रह प्रकाशित झाला, आणि त्यानंतर जवळपास २८ वर्षांनी गाथा एक नाथा‘‘ हा काव्यसंग्रह प्रसिद्ध झाला आहे. या संग्रहाच्या आधी मध्यंतरीच्या काळात त्यांनी ‘‘जग नावाचा अंधार‘‘ नाटक लिहिले आहे. ‘‘गाथा एकनाथा‘‘ संग्रह म्हणजे त्यांच्या साहित्य प्रवासाचे तसेच संसार वारीतल्या आयुष्याचे सिद्ध दर्शन आणि आलेले अनुभव असे जरी म्हटले तरी चालेल आपल्या पहिल्याच कवितेत ते म्हणतात...

वय बदलते
तशी कविता
अनुभवाचे बोलच
बोलते कविता !

हा संग्रह शब्द कविता, परिवर्तन, संदर्भ, संसार वारी, आणि परमार्थ अशा पाच विभागात विभागला आहे. संग्रहात एकूण १२५ कविता आहेत. या संग्रहात केवळ पारंपारिक भक्तीच नाही, तर समाजातील विसंगती, ग्रामीण जीवनातील कष्ट आणि सामान्य माणसाच्या संघर्षाला वाचा फोडणाऱ्या कवितांचा समावेश आहे.

शब्द कविता...

वय बदलते
तशी कविता
अनुभवाचे बोलच
बोलते कविता !

अगदी खरं आहे! अनुभवाच्या शाळेत जसे धडे मिळत जातात, तशी शब्दांची धार आणि कवितेचा अर्थही बदलत जातो.ओळींतून परिपक्वता जाणवते. सुरुवातीला कविता कदाचित केवळ कल्पनांवर आधारित असते, पण जसजसं वय आणि अनुभव वाढतात, तशी ती जीवनाचं सत्य मांडू लागते. देशमुखांची ही रचना अनुभवाचे बोल अगदी अचूक मांडते.

संसाराच्या राम रगाड्यात
मुलाबाळात नात्या गोत्यात विसरला गेलो
ओळख आता माझी माझ्याशी
मन भरून काळजाची अख्या
जन्माचा बोललो
लिहिता लिहिता
वही गच्च भरली
आनंद असा की
ज्ञानेश्वरी लिहिली
जसे भोगले अनुभवले
तसे लिहीत राहिलो
कर्माची पक्की दस्तऐवज
गोळा करीत गेलो
कधीतरी वरती चालणार खटला
पुरावा म्हणून कविता अन-
साक्षीदार असेल शब्दांचा गोतावळा.

ओळी अतिशय सुंदर आणि अर्थपूर्ण आहेत. अनुभवांना शब्दांत मांडून आयुष्याचा हिशोब मांडण्याची ही पद्धत मनाला भिडणारी आहे . गाथा एक नाथाची अनुभवांची शिदोरी आहे. जे काही वाट्याला आले, ते प्रामाणिकपणे कागदावर उतरवलेआहे. कविता म्हणजे केवळ शब्द नसून, ते तुमच्या कर्माचा आणि जगण्याचा जिवंत पुरावा आहेत. अर्थातच कर्माचा दस्तऐवजच आहे. जेव्हा आयुष्याचा प्रवास संपवून ‘‘वरती‘‘ जाण्याची वेळ येईल, तेव्हा हेच शब्द, गोतावळा तुमच्या अस्तित्वाचे साक्षीदार म्हणून उभे राहतील. शब्दांना साक्षीदार मानणे ही कल्पना खूपच सखोल आहे. एखाद्या संवेदनशील कवीचे मनच असा विचार करू शकते.

परिवर्तन

परिवर्तन हा आपल्या आयुष्याचा भाग आहे. अर्थातच ते परिवर्तन शब्दातून कवितेत उतरले नाही तर नवलच.

तेव्हाच जगणं हे खऱ्या अर्थाने जगणं होतं
पंख खूप विशाल तर आकाश छोटं होतं
पानगळीत नग्न झालेले झाड
ऋषीमुनी होती
बहराचा कहर तर उत्सवातील
तपस्वी माती
शेतीवाडीची अशी दाणाफान झाली
मधाळ आठवणी जपणाऱ्या खुणांची
पार वाट लागली....

कविता खूपच अर्थपूर्ण आणि काळजाला भिडणारी आहे. निसर्गातील बदल आणि माणसाची बदललेली जीवनशैली यांतील विरोधाभास खूप प्रभावीपणे मांडला आहे. विशाल पंख आणि छोटं आकाश हे माणसाच्या एकेकाळच्या उत्तुंग ध्येयांचे आणि अफाट हिमतीचे प्रतीक आहे. जेव्हा जिद्द मोठी असते, तेव्हा आभाळही ठेंगणे वाटते. ऋषीमुनींसारखी झाडं पानगळीच्या काळात सर्वस्वाचा त्याग करून शांत उभं राहलेलं झाड एखाद्या तपस्व्यासारखं वाटतं, जे पुन्हा बहरण्याची शांतपणे वाट पाहत असतं. जेव्हा निसर्ग बहरतो, तेव्हा त्या सौंदर्याच्या मागे मातीची वर्षानुवर्षांची तपश्चर्या आणि सोसणे असते. शेतीची दाणादाण आणि हरवलेल्या आठवणी, प्रगतीच्या नावाखाली किंवा बदलत्या काळामुळे निसर्गाचा जो ऱ्हास झाला आहे, त्याबद्दलची ही खंत आहे. जुन्या मधाळ खुणा आणि आठवणी आता नष्ट होत चालल्या आहेत, हे दुःख यात स्पष्ट जाणवते. देशमुखांच्या शब्दांतून निसर्गाप्रती असलेली ओढ आणि काळाच्या ओघात हरवलेल्या समृद्धीबद्दलची हुरहूर दिसून येते.

आठवणीतलं शेती वाडीचे शिवार
झाड झुडपं पशुपक्षी किड्या मुंगीचेही
उत्सव साजरं करणार
त्याच जागी वसलेलं नव शिस्तबद्ध
नगर
अंत्यविधीसाठी कर आकारणार...

डोक्याने चतुराईचा विचार केला
शेती नफ्याचे देणे फायद्याचे ठरले
हिरव्या रानटी भाल्यांनी हल्ला करून
जिवाभावाचे शब्द दूरदेशी नेले
अजूनही शेतीवाडीच्या कविता
वाचताना
डोळ्यात नितळकांच पाणी येते,
लाजही वाटते..

एकेकाळी जिथे निसर्ग आणि सजीव सृष्टीचा उत्सव असायचा, तिथे आज इतकी शिस्त आली आहे की, माणसाच्या शेवटच्या प्रवासालाही अंत्यविधी कर लावला जातोय. निसर्गाचं मोफत देणं आपण नगर बनवून महाग करून टाकलं आहे. आपण चतुराईने जमिनी विकल्या, नफा कमावला, पण त्या हिरव्यागार आठवणींना काँक्रीटच्या जंगलात गाडून टाकलं. शेतीवाडीच्या कविता वाचताना डोळ्यात येणारं पाणी ही त्या हरवलेल्या मातीची ओढ आहे, आणि लाज वाटते कारण हा विनाश आपण स्वतःच्या फायद्यासाठी स्वीकारला आहे.शहरीकरणाची टोचणी आणि हरवलेल्या निसर्गाची हुरहूर खूप प्रभावीपणे व्यक्त झाली आहे.

संदर्भ मरण

आपण गेल्यावर आठवणी सुद्धा
ठेवायला नको
वेळ नसतो कोणाला जपायला
आपल्यावर जीव टाकणारी मंडळीच
घाई करतात अंतयात्रेच्या तयारीला..

या कवितेतील वास्तव खूपच प्रखर आणि तितकेच कटू सत्य मांडणारे आहे. नात्यांमधील आणि काळातील बदललेल्या मानसिकतेवर अगदी मर्मभेदी भाष्य केले आहे. ज्यांना आपण आपले मानतो, जे आपल्यावर जीव लावतात, तेच अखेरच्या वेळी वेळेअभावी किंवा जगाच्या रितीनुसार घाई करतात, हे मनाला चटका लावून जाते. ‘‘आठवणी ठेवायला नको‘‘ असं जेव्हा माणूस म्हणतो, तेव्हा त्यामागे खूप मोठी निराशा किंवा विरक्ती असते. कोणालाही वेळ नाही हे समजल्यानंतर आलेलं हे शहाणपण आहे.आयुष्यभर ज्या प्रेमासाठी आपण झटतो, त्या प्रेमाचा शेवट इतका व्यवहारिक असू शकतो, हे खूप कमी शब्दांत मांडलं आहे. अतिशय गंभीर आणि चिंतनशील विचार देशमुखांनी कवितेतून मांडले आहे.

संसार वारी

संसाराला असतो आरंभ
कधीच नसतो अंत
मरेस्तवर करावा नेटका
कधीच करू नये खंत...
आयुष्यभर संसारासाठी समर्पण
संसारी करतो
नात्यागोत्याच्या रूपानं वाट्याला
आलेल्या
देवदानवाला सांभाळतो


या ओळी संसारातील संघर्षाचे आणि कर्माचे वास्तव मांडतात. संसाराची सुरुवात तर आपण करतो, पण तो कधी संपेल हे आपल्या हातात नसते. जोपर्यंत श्वास आहे, तोपर्यंत संसाराची कर्तव्ये चालूच राहतात. संसार ही एक निरंतर प्रक्रिया आहे. अगदी शेवटच्या श्वासापर्यंत आपल्याला आपली जबाबदारी पार पाडावीच लागते. त्यातून सुटका नाही.सर्वात महत्त्वाचा विचार हाच आहे की, हे सर्व करताना मनात कधीही दुःख किंवा पश्चात्ताप (खंत) ठेवू नये. जे काही वाट्याला आले आहे, ते आनंदाने आणि कर्तव्य भावनेने स्वीकारावे. थोडक्यात, ‘‘संसार ही एक अखंड साधना आहे, ती तक्रार न करता हसतमुखाने पार पाडावी‘‘ असा हा मोलाचा सल्ला कवितेतून दिला आहे..

परमार्थ

नको जप तप नको संसार सोडणे
गाभाऱ्यातल्या विठ्ठलासाठी
नामदेव पायरी होणे..

तुडवी अहंकार पायी
उधळी गुलाल बुक्कावारी
तुळशी माळेतील मन राम कृष्ण
हरी...

ही सुंदर ओळ वारकरी संप्रदायाचा आणि विठ्ठल भक्तीचा गाभा मांडते. भक्तीच्या वाटेवर चालताना सर्वात आधी स्वतःचा मीपणा किंवा अहंकार बाजूला सारून तो पायाखाली तुडवावा लागतो. जोपर्यंत माणूस नम्र होत नाही, तोपर्यंत त्याला विठ्ठलाची ओढ लागत नाही.विठ्ठलाच्या नामाचा आनंद साजरा करताना आनंदाने गुलाल-बुक्का उधळला जातो. हे बाह्य आनंदाचे आणि भक्तीच्या रंगात रंगल्याचे प्रतीक आहे.वारी म्हणजे केवळ पंढरपूरची पायपीट नाही, तर गळ्यात तुळशीची माळ घालून सात्विक मार्गाने जाणे होय. जेव्हा मन शुद्ध होते आणि अहंकार जातो, तेव्हा मुखात आणि मनात राम कृष्ण हरी हा मंत्र आपोआप जपला जातो.थोडक्यात सांगायचे तर, अहंकार सोडून, विठ्ठलाच्या प्रेमात न्हाऊन निघून, सात्विकतेने देवाचे नामस्मरण करणे म्हणजेच खरी भक्ती.




देशमुखांचे जीवनानूभव कवितेतून व्यक्त झाले आहेत.

या संग्रहात केवळ पारंपारिक भक्तीच नाही, तर समाजातील विसंगती, ग्रामीण जीवनातील कष्ट आणि सामान्य माणसाच्या संघर्षाला वाचा फोडणाऱ्या कवितांचा समावेश आहे. आपल्या प्रस्तावनेत जेष्ठ साहित्यिक महावीर जोंधळे म्हणतात माणूस वेगळेच व्यवधानात अडकला की कविता उंबरठ्याबाहेर थांबून प्रतिभा प्रवेशाची वाट बघत राहते. तसेच काहीसे एकनाथ देशमुख यांच्या बाबतीत झालेले आहे. काही काळ थांबून जेव्हा चिंतनासाठी वस्ती यायला लागते तेव्हा कविता पुन्हा जन्म घेते. पहिल्या कवितांना लगडून आलेली श्रद्धा पाणगळी सारखी गळून पडते, तसा अनुभव शब्द कविता मध्ये येतो. तारुण्य कल्पितांच्या बाजाला बगल देत जाणे प्रतिमा आणि अर्थ भाव त्यात दिसतो.

मराठी काव्याला भरभरून ग्रामीण सौंदर्य समृद्ध करणार आहे. परंतु त्याचबरोबर अशा कवितांची तेवढी दखल घेतली जात नाही. रसिकापर्यंत समीक्षकापर्यंत त्या पोहोचत नाही किंबहुना एवढी प्रसिद्धी माध्यमे असताना हक्काचे व्यासपीठ त्यांना लाभत नाही. अशी खंत एकनाथ देशमुख आपल्या मनोगत व्यक्त करतात. पुढे ते म्हणतात, ग्रुपइझम अर्थात गटबाजी मुळे जाणून काहींना दुर्लक्षित करण्याचा किंवा टाळण्याचा प्रकार सर्वत्र चाललेला दिसतो आहे असे देशमुख खेदाने नमूद करतात. असे माझे मत आहे आणि मी ते अनुभवले आहे असेही ते म्हणतात.

गाथा एक नाथा यात जे जे पांडुरंग रूपाने भेटले त्यांनी सोबत केली त्याचे मनस्वी आभार मानून आपले या क्षेत्रातील गुरु राजा महाजनसर यांचे शब्दरूपी आशीर्वाद कायम पाठीशी असल्याचे ते नमूद करतात. तसेच त्याचे कुटुंबीय यांचा ते सन्मान करतात. कविता रुजते कशी, फुलते कशी, जळते कशी, आणि जाळते कशी, याची ही माझी अनुभूती आहे. माझ्या या काव्य क्षेत्रातील स्थान कुठे आहे हे ठरण्याचा अधिकार वाचकाचा आहे. त्यातून आपल्याला काही आनंद मिळाला तर मी स्वतःला धन्य मानतो. अशी प्रामाणिक भावना व्यक्त करतात.

दिंडीत नाचतो अभंग,
तालात तल्लीन टाळ मृदंग,
संसारी सुखी- दुखी माणसांना
एकमेकांच्या रूपाने
भेटे पांडुरंग !

खूपच सुंदर आणि सकारात्मक विचार देशमुखांनी मांडला आहे. या ओळींमधून वारीचा आणि वारकरी विचाराचा खरा अर्थ उलगडतो. वारीमध्ये जेव्हा वारकरी अभंग गात नाचतात, तेव्हा ते केवळ शरीर नाचवत नसून त्यांचे मन विठ्ठलाच्या भक्तीत नाचत असते. टाळ आणि मृदंगाचा तो नाद माणसाला देहभान विसरायला लावतो.माणसांत भेटे पांडुरंग या ओळीचा अर्थ खूप सखोल आहे. संसारात प्रत्येकाला सुखाचे आणि दुःखाचे क्षण येतात. अशा वेळी जेव्हा एखादा माणूस दुसऱ्याच्या मदतीला धावून येतो किंवा एकमेकांना आधार देतो, तेव्हा त्या माणुसकीतच प्रत्यक्ष पांडुरंग दर्शन देतो.

‘‘जे का रंजले गांजले, त्यासी म्हणे जो आपुले‘‘ या तुकाराम महाराजांच्या उक्तीप्रमाणे, माणसात देव शोधण्याची ही वृत्ती खूप मोलाची आहे.संग्रहातील प्रत्येक कविता जीवनातील सत्य सांगून जाते.

‘‘गाथा एक नाथा‘‘ हा संग्रह ज्यांच्यामुळे व ज्यांच्या सोबत लिहिला गेला, या माझ्या संसारीक काव्य वारीत जे जे पांडुरंग रुपात भेटले ज्यांनी सोबत केली त्यांचे ते मनस्वी आभार मानतात. संग्रहाला साहित्यिक महावीर जोंधळे यांनी सविस्तर अशी प्रस्तावना दिली आहे, तो देशमुख त्यांच्या कवितेचा सन्मान मानतात. संग्रहाचे मुखपृष्ठ, मलपृष्ठ आणि रेखाटणे चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांनी सुंदर रेखाटले आहे.मांडणी चांगली आहे. संग्रहाची अर्पणपत्रिका चांगली आहे. एकदा हा संग्रह वाचायला हवा.

हा कवितासंग्रह सौ शशिकला देशमुख. भक्ती प्रकाशन. ७, भक्ती निवास, जिल्हा पेठ पोलीस स्टेशन रोड, जळगाव.४२५००१ यांनी प्रकाशित केला असून संग्रहाचे मूल्य ₹ २२५/-

संपर्क-. ९९२२४२३२८१

पान १ वरुन

### ८७ संयुक्त ...

महिन्यांत ठोस कृती आराखडा सादर करण्याचे आदेश देत भविष्यात अशा घटना रोखण्यासाठी प्रभावी उपाययोजना करण्याचेही सांगितले आहे. तसेच सर्व संबंधित प्रकरणांमध्ये पोस्को अधिनियम, २०१२ व बालविवाह प्रतिबंधक कायदा अंतर्गत गुन्हे नोंदवून दोषींवर कठोर कारवाई करावी, असे स्पष्ट निर्देश देण्यात आले. प्रत्येक प्रकरणाचा आढावा बालकल्याण समिती मार्फत घेण्याचेही आदेश आहेत. दरम्यान, सर्व अल्पवयीन मातांना आवश्यक वैद्यकीय उपचार, पोषण व समुपदेशन सुविधा उपलब्ध करून देणे, तसेच संबंधित मुलींचे शिक्षण खंडित होऊ नये यासाठी विशेष उपाययोजना करण्याचे निर्देश आयोगाने दिले आहेत. राज्यभरात बालविवाह व बाल लैंगिक अत्याचार प्रतिबंधासाठी जनजागृती मोहिमा राबविण्याबरोबरच राजस्थान राज्याप्रमाणे महाराष्ट्रातही लग्नपत्रिकेत वधू-वराची जन्मतारीख नमूद करणे बंधनकारक करण्याबाबत राज्य सरकारला सूचना पाठवण्याचा निर्णय आयोगाने घेतला असल्याची माहिती डॉ. संजय लाखेपाटील यांनी दिली आहे.

या सुनावणीस अध्यक्ष ॲड. संजय पुराणिक, सदस्य डॉ. संजय लाखे पाटील, श्रीमती गितांजली बुटी, श्रीमती तांबट, अतुल देसाई, प्रविण भुजाडे, श्रीमती मिलन जंगम, सेक्रेटरी प्रविण देवरे (आयएएस) तसेच प्रशासकीय अधिकारी वंदना जैन (अवर सचिव) उपस्थित होते.

### जालना जिल्ह्यात ...

परिषदेत या मोहिमेबाबत सविस्तर माहिती देण्यात आली.

महत्त्वाचे टप्पे आणि वेळापत्रक:

स्व-गणना (-): १ मे ते १५ मे २०२६ या काळात नागरिक ... या पोर्टलवर आपली माहिती स्वतः भरू शकतात. माहिती भरल्यावर मिळणारा युनिक आयडी प्रगणकाकडे सादर करणे आवश्यक आहे.

गृहसूचीकरण मोहीम: १६ मे ते १४ जून २०२६ या कालावधीत प्रगणक प्रत्यक्ष घरांना भेटी देऊन मोबाईल ॲपद्वारे माहिती संकलित करतील. लोकसंख्या गणना: प्रत्यक्ष लोकसंख्येची मोजणी फेब्रुवारी २०२७ मध्ये पार पडणार आहे.

३४ प्रश्नांद्वारे होणार माहिती संकलन:

या पहिल्या टप्प्यात प्रत्येक कुटुंबाला एकूण ३४ प्रश्न विचारले जाणार आहेत. यामध्ये प्रामुख्याने:

घराची स्थिती: बांधकामाचे साहित्य, खोल्यांची संख्या, घराचा वापर.

सुविधा: पिण्याचे पाणी, वीज, शौचालय, स्वयंपाकाचे इंधन (एलपीजी जोडणी).

मालमत्ता: लॅपटॉप, इंटरनेट, रेडिओ, टीव्ही, वाहने (सायकल/ कार/स्कूटर) यांची माहिती घेतली जाईल.

कुटुंब: कुटुंब प्रमुखाचे नाव, लिंग, जात (//इतर) आणि सदस्यांची संख्या.

जिल्ह्याची प्रशासकीय तयारी:

जालना जिल्ह्यात या मोहिमेसाठी २,८१८ गणना ब्लॉक्स () निश्चित करण्यात आले आहेत. यासाठी ३,१०० प्रगणक ५१९ पर्यवेक्षक आणि ६१ फिल्ड ट्रेनर्स यांची नियुक्ती करण्यात आली आहे. या सर्व कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण सध्या जिल्हा व तालुका स्तरावर सुरू आहे.

अचूक माहिती देणे बंधनकारक:

जनगणना कायदा १९४८ नुसार विचारलेल्या प्रश्नांची अचूक उत्तरे देणे जनतेस बंधनकारक आहे. ही माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाते आणि कोणत्याही पुराव्यात ग्राह्य धरली जात नाही. त्यामुळे नागरिकांनी प्रगणकांना सहकार्य करून बिनचूक माहिती द्यावी, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# सेवली येथे ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर’ उत्साहात ; १२०० शेतकऱ्यांची उपस्थिती

**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील मौजे सेवली येथे दिनांक २३ एप्रिल, २०२६ रोजी ‘छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधान शिबिर’ मोठ्या उत्साहात पार पडले. या शिबिरात कृषी विभागाच्या विविध शासकीय योजनांची माहिती देण्यात आली तसेच नागरिकांच्या समस्या ऐकून त्यावर त्वरित तोडगा काढण्यात आला.

या समाधान शिबिरास आमदार बबनराव लोणीकर, उपविभागीय अधिकारी जालना रामदास दौंड, तहसीलदार श्रीमती छाया पवार, तालुका कृषी अधिकारी व्ही.जे. राठोड, मंडळ कृषी अधिकारी प्रियांका क्षीरसागर, भरत नागरे, उप कृषी अधिकारी देशमुख यांच्यासह कृषी विभागाचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

शिबिरात कृषी विभागाच्या वतीने विविध योजनांबाबत सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. यामध्ये पीएम किसान योजना अंतर्गत त्रुटी असलेल्या लाभार्थ्यांच्या नोंदी दुरुस्त करून त्यांना लाभ मिळवून देण्यात आला. तसेच प्रधानमंत्री कृषी सिंचन योजना (), कृषी यांत्रिकीकरण योजना, माती नमुना तपासणी, गोपीनाथ मुंडे अपघात विमा योजना आणि एकात्मिक फलोत्पादन





विकास अभियान यांसारख्या योजनांची माहिती शेतकऱ्यांना देण्यात आली.

यावेळी कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत प्रातिनिधिक स्वरूपात काही शेतकऱ्यांना ट्रॅक्टरचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. तसेच सोयाबीन, करडई, मोहरी, उडीद, भुईमूग आदी पिकांच्या माहितीपत्रिकांचे वितरण करून शेतकऱ्यांना आधुनिक शेती तंत्रज्ञानाची माहिती देण्यात आली.

शिबिरात सेवली महसूल मंडळातील उत्कृष्ट उत्पादन घेणाऱ्या शेतकऱ्यांनी फळपिके व भाजीपाला पिकांचे नमुने प्रदर्शित केले. टोमॅटो, भेंडी, मिरची, हळद, फ्लॉवर, दोडका, वांगे यांसह ड्रॅगन फ्रूट, टरबूज आणि चिया सीड्स यांसारख्या पिकांचे एकूण २५ नमुने स्टॉलवर मांडण्यात आले होते. या स्टॉलला भेट देणाऱ्या शेतकऱ्यांनी पिकांबाबत सविस्तर माहिती जाणून घेतली.

तसेच नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प (टप्पा २) अंतर्गत प्रातिनिधिक स्वरूपात पूर्वसंमती प्रमाणपत्रांचे वाटपही मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

या शिबिरास सुमारे १२०० शेतकरी उपस्थित होते. परिसरातील सर्व गावांचे सरपंच, पदाधिकारी आणि मोठ्या संख्येने शेतकरी बांधवांनी सहभाग नोंदवला. शेतकऱ्यांनी कृषी विभागाच्या कार्याबद्दल समाधान व्यक्त केले. कृषी विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट नियोजन करून हा उपक्रम यशस्वीरीत्या पार पाडला.

---

## नेत्रदानाबाबतचे गैरसमज दूर करण्याची गरज - उमा झंवर

### परतूरमध्ये नेत्रदान जनजागृतीचा जागर; दृष्टी नेत्रालयाच्या कार्याचा गौरव



**जालना । प्रतिनिधी -** एका व्यक्तीच्या नेत्रदानामुळे तीन अंध व्यक्तींच्या जीवनात प्रकाशाचा किरण येऊ शकतो. आधुनिक तंत्रज्ञानामुळे नेत्रदान प्रक्रिया आता अत्यंत सुलभ झाली असून, समाजाने या महान कार्यात हिरीरीने पुढे येणे काळाची गरज आहे, असे प्रतिपादन एम.के. इंटरनॅशनल आय बँक (इंदौर) च्या कार्यकारी निदेशक तथा सेंट्रल झोन आय बँक असोसिएशन ऑफ इंडियाच्या चेयरपर्सन उमा झंवर यांनी केले.

लायन्स क्लब ऑफ परतूर व दृष्टी लायन्स नेत्रालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित नेत्रदान जनजागृती कार्यक्रमात त्या प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होत्या. अध्यक्षस्थानी अतुल लड्डा होते तर प्रमुख पाहुणे म्हणून अभय करवा उपस्थित होते. उमा झंवर पुढे म्हणाल्या की, आमच्या संस्थेने आतापर्यंत १७ हजारहून अधिक नेत्रदान संकलित करून १७ राज्यांमध्ये कॉर्निया प्रत्यारोपण केले आहे. आता संपूर्ण डोळा न काढता केवळ कॉर्निया काढून तो ४ दिवसांच्या आत गरजू रुग्णांना बसवता येतो.

दृष्टी फाउंडेशनचे अध्यक्ष मनोहर खालापुरे यांनी नेत्रालयाच्या प्रगतीचा अहवाल सादर करताना नेत्रालयाने गाठलेले महत्त्वाचे टप्पे मांडले. ते म्हणाले की, गेल्या ३ वर्षांत १ लाखाहून अधिक रुग्णांची नाममात्र शुल्कात तपासणी करण्यात येऊन १२ हजारपेक्षा जास्त यशस्वी नेत्र शस्त्रक्रिया मोफत व अल्प दरात करण्यात आले आहेत. नेत्रालय अंतर्गत डायलिसिस विभागाद्वारे आतापर्यंत ५५७ रुग्णांना मोफत उपचार देण्यात आले. परतूरसह परिसरातील ९ ते १० तालुक्यांतील नागरिकांना या सेवांचा लाभ मिळत आहे.

यावेळी अभय करवा यांनी स्वतः सुमारे ९०० नेत्रदान उपक्रमांमध्ये दिलेल्या योगदानाची माहिती दिली. कार्यक्रमाला उपस्थित लायन्स क्लबचे सदस्य, डॉक्टर्स आणि कर्मचाऱ्यांनी स्वतःसह आपल्या कुटुंबीयांचे नेत्रदान अर्ज भरून देण्याचा निर्धार केला. येत्या जून महिन्यापासून नेत्रालयातर्फे पॅरामेडिकल कोर्स सुरू होत आहेत. बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांना याद्वारे रोजगाराच्या संधी उपलब्ध होऊन ते स्वावलंबी होतील, अशी माहिती खालापुरे यांनी दिली. या उपक्रमामुळे परतूर आणि जालना जिल्ह्यात नेत्रदानाबाबत मोठी जनजागृती निर्माण झाली असून, अंधत्व निर्मूलनाच्या मोहिमेला यातून मोठी गती मिळणार आहे.

---

## अंजेभाऊ चव्हाण यांची राष्ट्रीय बंजारा महासंघ प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती

**जालना । प्रतिनिधी -** जालना तालुक्यातील पाहेगाव(लक्ष्मीनगर) येथील सामाजिक कार्यकर्ते अंजेभाऊ चव्हाण यांची राष्ट्रीय बंजारा महासंघ प्रदेश उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे.हि नियुक्ती राष्ट्रीय अध्यक्ष भिकन जाधव, संस्थापक तथा प्रदेश अध्यक्ष पि.टी.चव्हाण, प्रदेश कार्याध्यक्ष मधुकर जाठोत, प्रदेश सरचिटणीस अमोल पवार यांनी केली आहे. यावेळी राष्ट्रीय बंजारा महा संघाचे संस्थापक अध्यक्ष पि.टी. चव्हाण यावेळी म्हणाले की,अंजेभाऊ चव्हाण यांची नियुक्ती झाल्याबद्दल आम्हाला अत्यंत आनंद होत आहे.आपण मागिल काही वर्षापासून करत असलेले सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, सांस्कृतिक व राजकीय क्षेत्रातील उल्लेखनीय कार्याची दखल घेऊन राष्ट्रीय बंजारा महासंघ या संघटनेच्या ‘‘प्रदेश उपाध्यक्ष‘‘ पदी आपली सर्वानुमते नियुक्ती करण्यात येत आहे. याबद्दल आपले हार्दिक- हार्दिक अभिनंदन. आपण आपल्या बुद्धि कौशल्याने,त्यागी व समर्पित भावनेने तसेच संविधानीक मार्गाने कायद्याच्या चौकटीत राहून बंजारा समाजाचे जनहित जोपासावे. संघटनेला अधिक गतिमान व बळकट करीत असताना गोर बंजारा समाजाच्या संविधानीक न्याय हक्कासाठी अविरत प्रयत्नशील रहावे.राष्ट्रीय व राज्य स्तरावर समाज व राष्ट्रीय बंजारा महासंघाचे नाव लौकिक करावे. आपल्या सार्थ नियुक्ती बद्दल मनापासून अभिनंदन, भविष्यातील सर्व चांगल्या राजकीय वाटचालीसाठी मंगलमय शुभेच्छा.आपण करीत असलेल्या सामाजिक शैक्षणिक व सांस्कृतिक तसेच संघटनात्मक कार्याचा अहवाल राष्ट्रीय बंजारा महासंघाचे प्रदेशाध्यक्ष तथा वरिष्ठ पदाधिकाऱ्यांना प्रत्येक महिन्याला लेखी स्वरूपात कळविण्यात यावे. हि नियुक्ती तात्काळ लागू करण्यात येत आहे. असे विचार राष्ट्रीय बंजारा महासंघाचे संस्थापक अध्यक्ष प्रा.पी.टी.चव्हाण यांनी सांगितले आहे.



---

## जालना जिल्ह्यात ११०६ रुग्णांना सुमारे ८.५६ कोटींची मदत

### मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून आरोग्यसेवेला गती

**जालना । प्रतिनिधी -** शासनाच्या आरोग्यविषयक विविध योजनांमधून मदत न मिळालेल्या पात्र व गरजू रुग्णांसाठी मुख्यमंत्री वैद्यकीय सहाय्यता निधी आधार ठरत आहे. जालना जिल्ह्यात आर्थिक वर्षात ११०६ रुग्णांना सुमारे ८ कोटी ५६ लाख रुपयांची वैद्यकीय आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दूरदृष्टीतून जिल्हा कक्षाची स्थापना, पेपरलेस अर्ज प्रक्रिया, तातडीने अर्जाचा निपटारा करणे आदी सकारात्मक बदल करण्यात आले. त्यासोबतच सामंजस्य करार, क्राउड फंडिंग आदींच्या माध्यमातून समाजातील मदत करणारे रूग्णालय, धर्मादाय रूग्णालय, संस्था, दाते आदींच्या सहकार्य लाभत आहे.

मुख्यमंत्री सहाय्यता निधीच्या कार्यपद्धतीत केलेल्या सुधारणा आणि मदतीचे विविध मार्ग उपलब्ध करून दिल्याने पारदर्शकता वाढून मदत वितरणाचा वेग लक्षणीयरित्या वाढला आहे. परिणामी, अधिकाधिक पात्र रुग्णांना वेळेत आर्थिक सहाय्य मिळत आहे.

**२० गंभीर आजारासाठी मदत :** कॉक्लियर इम्प्लांट (वय वर्ष २ ते ६), हृदय, यकृत, किडनी, फुफ्फुस, बोन मॅरो, हाताचे, गुडघ्याचे प्रत्यारोपण, हिप रिप्लेसमेंट, कर्करोग शस्त्रक्रिया, रस्ते अपघात, लहान बालकांची शस्त्रक्रिया, मेंदूचे आजार, हृदयरोग, डायालिसिस, कर्करोग (केमोथेरपी/रेडिएशन), अस्थिबंधन, नवजात शिशुंचे आजार, बर्न (भाजलेले) रुग्ण, विद्युत अपघात रुग्ण या अशा एकूण २० गंभीर आजारांसाठी अर्थसहाय्य दिले जाते.

**सामंजस्य करारातून मदतीचा मार्ग मोकळा** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकाराने मुख्यमंत्री सहाय्यता निधी कक्ष, बीपीसीएल फाऊंडेशन व टाटा मेमोरियल सेंटर यांच्यात बालकांच्या कर्करोग उपचारासाठी नुकताच सामंजस्य करार करण्यात आला आहे. या करारामुळे सामाजिक दायित्व (सीएसआर) अंतर्गत उपचारांसाठी विशेष निधी उपलब्ध होणार आहे. आर्थिक अडचणी कमी होऊन गरजू बालकांना गुणवत्तापूर्ण कर्करोग उपचार सुलभ होणार आहेत.

**आर्थिक वर्षातील मदत**

१ एप्रिल २०२५ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत राज्यातील तब्बल ४० हजार ७७६ रुग्णांना ३३३ कोटी ६ लाख ८१ हजार ५०० रुपयांची वैद्यकीय मदत देण्यात आली आहे. तर, याच कालावधीत जालना जिल्ह्यातील ११०६ रुग्णांना सुमारे ८ कोटी ५६ लाख ८५ हजार रुपयांची आर्थिक मदत वितरित करण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पुढाकारातून राज्यातील शेकडो गरजू रुग्णांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून उपचारासाठी भक्कम आधार मिळत आहे. सुधारित कार्यपद्धती, तातडीने निर्णय आणि समाजाच्या सहभागामुळे मदतीचा लाभ अधिक वेगाने गरजूंपर्यंत पोहोचत आहे. अधिक माहितीसाठी व सहाय्यासाठी रूग्णांनी १८०० १२३ २२११ या टोल-फ्री क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन मुख्यमंत्री सहाय्यता निधी व धर्मादाय रूग्णालय मदत कक्षाचे कक्ष प्रमुख रामेश्वर नाईक यांनी केले आहे.

---

## जालन्यात दिव्यांग पुनर्वसन केंद्र २९ तारखेपर्यंत सुरु

**जालना । प्रतिनिधी -** दिव्यांग नागरिकांच्या सोयी-सुविधांसाठी जालना शहरात लवकरच दिव्यांग पुनर्वसन केंद्र सुरू होणार असल्याची माहिती जिल्हाधिकारी अशिमा मित्तल यांनी दिली आहे. येत्या २९ तारखेपर्यंत हे केंद्र कार्यान्वित होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. जालना शहरातील महिला व बाल रुग्णालयाच्या मागील परिसरात हे केंद्र सुरू करण्यात येणार असून, या माध्यमातून दिव्यांग नागरिकांना विविध सेवा एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्याचा प्रशासनाचा प्रयत्न आहे. या केंद्रामुळे दिव्यांगांना सरकारी योजनांचा लाभ घेण्यासाठी वारंवार वेगवेगळ्या कार्यालयात फिरावे लागणार नाही, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.



जिल्हाधिकारी मित्तल यांनी पत्रकार परिषदेत सांगितले की, या पुनर्वसन केंद्रात दिव्यांगांसाठी आवश्यक असलेली कागदपत्रे, युनिक आयडी () कार्ड संबंधित सेवा, तसेच कृत्रिम अवयव, व्हीलचेअर, श्रवणयंत्र यांसारखी आवश्यक साधने उपलब्ध करून दिली जाणार आहेत. तसेच दिव्यांगांच्या विविध समस्यांचे मार्गदर्शन व निवारणही याच केंद्रातून करण्यात येणार आहे. दिव्यांग बांधवांना स्वावलंबी बनवण्याच्या दृष्टीने हे केंद्र महत्त्वपूर्ण ठरणार असून, शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्यासही मदत होणार आहे. या उपक्रमामुळे जालना जिल्ह्यातील दिव्यांगांना मोठा दिलासा मिळणार असल्याचेही त्यांनी नमूद केले. प्रशासनाच्या या निर्णयाचे दिव्यांग नागरिक व सामाजिक संघटनांकडून स्वागत करण्यात येत आहे.

---

## रांजनी बीटमध्ये आगामी शैक्षणिक वर्षासाठी नियोजन बैठक संपन्न





**जालना । प्रतिनिधी -** शाळांमध्ये केवळ पुस्तकी शिक्षण देऊन चालणार नाही, तर विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करणे आवश्यक आहे. जागतिक पुस्तक दिनाचे औचित्य साधून प्रत्येक जिल्हा परिषद शाळेत सुसज्ज ग्रंथालय सुरू करावे आणि विद्यार्थ्यांना अवांतर वाचनासाठी प्रवृत्त करावे, असे आवाहन शिक्षण विस्तार अधिकारी अशोक सोळंके यांनी केले.

घनसावंगी तालुक्यातील रांजनी बीटमधील केंद्रप्रमुख आणि मुख्याध्यापकांची आगामी शैक्षणिक वर्ष २०२६-२७ ची नियोजन बैठक सरस्वती भवन विद्यालय, राजनी येथे पार पडली. या बैठकीच्या अध्यक्षस्थानावरून सोळंके बोलत होते. यावेळी व्यासपीठावर केंद्रप्रमुख श्री. पवार, श्री. डोळझाके, दिलीप महाजन यांची प्रमुख उपस्थिती होती.

दि. १ मे २०२६ रोजी महाराष्ट्र दिनाचे औचित्य साधून शाळांमध्ये नवीन प्रवेश प्रक्रिया राबविण्यात येणार आहे. ६ वर्षे पूर्ण झालेल्या प्रत्येक बालकाला शाळेच्या प्रवाहात आणण्यासाठी मुख्याध्यापकांनी विशेष प्रयत्न करावेत, अशा सूचना यावेळी देण्यात आल्या. तसेच, या दिवशी विद्यार्थ्यांचा सत्कार करून पालक आणि शाळा व्यवस्थापन समितीची संयुक्त सभा घेण्याचेही नियोजन करण्यात आले आहे. १५ जूनपासून नवीन शैक्षणिक वर्षाची सुरुवात होणार आहे. त्यापूर्वी शाळांमध्ये खालील सुविधा सुसज्ज ठेवण्याचे आदेश देण्यात आले आहेत. स्वच्छ पिण्याचे पाणी आणि स्वतंत्र स्वच्छतागृहे, दिव्यांग विद्यार्थ्यांसाठी रॅम्पची उपलब्धता, शाळा परिसर स्वच्छ आणि सुंदर ठेवणे आदि पायाभूत सुविधांवर भर द्यावा. असेही सांगितले.

विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होऊ नये यासाठी शासनाच्या वतीने पहिल्याच दिवशी मोफत पाठ्यपुस्तके आणि गणवेश उपलब्ध करून दिले जाणार आहेत. शाळा सुरू होताच अभ्यासाला गती मिळेल, असा विश्वास केंद्रप्रमुख श्री. पवार यांनी व्यक्त केला. या बैठकीला रांजनी बीटमधील सर्व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक आणि शिक्षक मोठ्या संख्येने उपस्थित होते. शैक्षणिक दर्जा उंचावण्यासाठी सर्वांनी कटिबद्ध राहण्याचा निर्धार या प्रसंगी करण्यात आला.

---

## अनुसूचित जाती उपवर्गीकरण विरोधात राहुल करनाडे यांचे निवेदन

**जालना । प्रतिनिधी -** अनुसूचित जाती आरक्षणाच्या प्रस्तावित उपवर्गीकरणास जालना येथील सामाजिक कार्यकर्ते राहुल सत्यनारायणजी करनाडे यांनी ठाम विरोध दर्शवित जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन सादर केले. या निवेदनात त्यांनी नमूद केले आहे की, अनुसूचित जातींसाठीची आरक्षण व्यवस्था ही ऐतिहासिक सामाजिक अन्याय दूर करण्यासाठी निर्माण करण्यात आलेली संविधानिक संरक्षण यंत्रणा आहे. प्रस्तावित उपवर्गीकरणामुळे अनुसूचित जाती समाजामध्ये अंतर्गत विभागणी निर्माण होण्याची शक्यता असून सामाजिक ऐक्यावर परिणाम होऊ शकतो, अशी भूमिका त्यांनी मांडली. भारतीय संविधानातील कलम १४, १५(४), १६(४) व ४६ चा संदर्भ देत त्यांनी शासनाने कोणताही अंतिम निर्णय घेण्यापूर्वी सर्व समाजघटकांना विश्वासात घ्यावे, अशी मागणी केली आहे. तसेच संबंधित सर्वेक्षण अहवाल, निकष व अभ्यास माहिती सार्वजनिक करावी आणि राज्यस्तरीय सार्वजनिक सुनावणी आयोजित करावी, असेही त्यांनी निवेदनात नमूद केले आहे. योग्य कार्यवाही न झाल्यास संविधानिक व कायदेशीर मार्गांचा अवलंब करण्याचा इशाराही त्यांनी दिला आहे.

# रिटेल ॲण्ड होलसेल केमिस्ट असोसिएशनच्या अध्यक्षपदी प्रमोद तोतला तर सचिवपदी संजय बोबडे

**जालना । प्रतिनिधी -** रिटेल ॲण्ड होलसेल केमिस्ट असोसिएशन ऑफ जालना डिस्ट्रिक्टच्या नूतन कार्यकारिणीची निवड करण्यात आली असून, अध्यक्षपदी प्रमोद तोतला, सचिवपदी संजय बोबडे तर कोषाध्यक्षपदी मनोज कुमकर यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. ही संघटना राज्य संघटनेशी संलग्न राहून औषध विक्रेत्यांच्या हितासाठी कार्य करणार असल्याची माहिती नूतन अध्यक्षांनी दिली आहे.

संस्थेच्या अन्य पदाधिकाऱ्यांची निवडही जाहीर करण्यात आली असून त्यात उपाध्यक्षपदी दिलीप दाणी व गणेश चिडे, सहसचिवपदी मंगेश वाणी, संघटक सचिव म्हणून आनंद वरियानी, जनसंपर्क प्रमुख पदी अमजद खान पठाण (गुड्डुभाई), कार्यकारिणी सदस्यांमध्ये बिरज करवा, श्रीनिवास सिकची आणि दिनेश लाहोटी यांचा समावेश आहे.

दरम्यान नवनिर्वाचित अध्यक्ष श्री तोतला यांनी संघटनेची आगामी ध्येयधोरणे बनवितांना विविध समित्यांची स्थापना करून कामाचा ओघ सुलभ व्हावा यासाठी १) अन्न व औषध प्रशासन समन्वय समिती, २) सभासद नोंदणी समिती आणि ३) स्टॉकीस्ट अपॉइंटमेंट समिती स्थापन केली जाणार असल्याचे स्पष्ट केले. औषध विक्रेत्यांना अत्याधुनिक माहिती आणि तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी तज्ज्ञांचे मार्गदर्शन उपलब्ध करून दिले जाईल. वर्षातून किमान एकदा सर्वसाधारण सभा घेतली जाईल आणि आर्थिक व्यवहारात पूर्ण पारदर्शकता ठेवली जाईल. जिल्हा स्तरासोबतच तालुका पातळीवर शहर बॉडी बनवणे आणि तालुकाध्यक्षांच्या नियुक्त्या करण्याचे काम प्राधान्याने केले जाणार असल्याचेही श्री तोतला यांनी म्हंटले आहे.

पदाचा उपयोग सभासदांच्या हितासाठीच करणार असल्याचे गणेश चिडे, उपाध्यक्ष यांनी स्पष्ट केले ते म्हणाले, ''संघटनेचे पद ही मिरवण्याची गोष्ट नसून ती एक जबाबदारी आहे. ग्रामीण भागातील औषध विक्रेत्यांचे जाळे अधिक मजबूत करण्यावर आमचा भर राहील.''

इच्छुकांना संधी मिळणार असल्याची प्रतिक्रिया संजय बोबडे, सचिव यांनी दिली. ''संघटनेत विविध समित्या स्थापन केल्या जाणार आहेत. ज्या सभासदांना सक्रिय सहभाग नोंदवायचा आहे, त्यांना या समित्यांमध्ये नक्कीच संधी दिली जाईल.''

आर्थिक शिस्त पाळणार असल्याचे मनोज कुमकर, कोषाध्यक्ष यांनी म्हंटले आहे.''कोषाध्यक्ष म्हणून मी प्रत्येक पैशाचा हिशोब पारदर्शक ठेवेन. कार्यकारिणीच्या मंजुरीनेच खर्च केला जाईल आणि दरवर्षी ऑडिटेड बॅलन्स शीट सभासदांसमोर सादर केले जाईल. या निवडीनंतर जालना जिल्ह्यातील औषध विक्रेत्यांमध्ये उत्साहाचे वातावरण आहे.

## राज्य संघटनेच्या मार्गदर्शनात करणार काम - प्रमोद तोतला

संस्थापक अध्यक्ष प्रमोद तोतला यांनी संघटनेच्या भविष्यातील वाटचालीवर प्रकाश टाकला. ते म्हणाले की, ''आमची संघटना राज्य अध्यक्ष जगन्नाथ अप्पा शिंदे व सचिव अनिलभाऊ नावंदर यांच्या मार्गदर्शनाखाली कार्य करेल. औषध व्यवसायातील अडचणी सोडवणे, व्यावसायिकांना कायदेशीर मार्गदर्शन करणे आणि प्रशिक्षण शिबिरांच्या माध्यमातून सभासदांना अद्ययावत ठेवणे हे आमचे मुख्य उद्दिष्ट असेल.

## अन्य कुणी नाव वापरल्यास कायदेशीर कारवाई करुत - बिरज करवा

यावेळी बोलताना कार्यकारिणी सदस्य बिरज करवा यांनी स्पष्ट केले की, संघटनेची धर्मादाय आयुक्त कार्यालयात सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था १९५० च्या कलम १८ नुसार कायदेशीर नोंदणी करण्यात आली आहे (नोंदणी क्र. एफ १३३७६ - जा). तसेच संस्था नोंदणी अधिनियम १८६० अन्वये ही संस्था नोंदणीकृत असून त्याचा क्र. १२१/२०२५ आहे. ''रिटेल अँड होलसेल केमिस्ट असोसिएशन हे नाव धर्मादाय आयुक्तांकडे नोंदणीकृत आहे. त्यामुळे हे नाव फक्त आमचीच संघटना वापरू शकते. अन्य कोणीही या नावाचा वापर केल्यास त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात येईल,'' असा इशारा बिरज करवा यांनी दिला आहे.

# अहिर गवळी समाज सामुहिक विवाह सम्मेलन संस्थापक महासमितितर्फे ४७ जोडपेचा विवाह सोहळा संपन्न

**जालना । प्रतिनिधी -** दिनांक २१ एप्रिल २०२६, मंगळवार रोजी सायंकाळी ७ वाजता श्रीकृष्ण नगरी, पावन तपोधाम श्री गुरुगणेश भवन, जैन विद्यालय जालना येथे सामुहिक विवाह संमेलन महासमितीतर्फे ४७ जोडपेचा विवाह संपन्न झाले. हा विवाह सोहळा दिनांक २० व २१ एप्रिल २०२६ या दोन दिवशी विवाह कार्यक्रमात माजी केंद्रीय गृहमंत्री हंसराजभैय्या अहीर, जालना लोकसभेचे खासदार कल्याण काळे, जालना विधानसभा आमदार अर्जुन खोतकर यांनी अहिर गवळी समाजाच्या वर-वधुस शुभेच्छा देऊन अहिर गवली समाज समितीच्या कार्याचा कौतुक केले. यावेळी मंडले चौधरी,बरेटिये चौधरी,भुरेवाल चौधरी ,जांगडे चौधरी,भगत चौधरी,कडपेवाले,और जमदार यांच्या उपस्थिती संपन्न झाले.

या सामुहिक विवाह सम्मेलनात प.पु. मनोज गौड महाराज यांचे सामाजिक, अध्यात्मिक, देशभक्ति व भजन संध्याचा कार्यक्रम संपन्न झाला. या सामुहिक विवाह संमेलनात प्रमुख पाहुणे म्हणून जालना शहर महानगरपालिकेचे महापौर वंदना अरुण मगरे, उपमहापौर राजेश रामभाऊ राऊत भाजप विधानसभा प्रमुख नगरसेवक भास्करराव आबा दानवे, जालना महानगरपालिकेचे स्वच्छता सभापती कपिल श्रावण भुरेवाल, नगरसेवक अक्षय गोरंटयाल, नगरसेवक अश्विन अंबेकर, अकोटचे नगरसेवक बादल अहीर, नगरसेवक रमेश गौरक्षक, नगरसेवक दुर्गेश काठोठीवाले, विरोधीपक्ष नेते कमलेश खरे, नगरसेविका पुजा दिनेश भगत,नगरसेविका पुजा योगेश भगत,नगरसेवीका प्रियंका रोहित भुरेवाल, नगरसेविका शोभाबाई गोपाल नारीयलवाले, भाजपा नविन जालना मंडळाध्यक्ष सुनिल खरे, धन्नु काबलिये, कपिल बरेटिये चौधरी,मेघराज भगत, छ.संभाजीनगर येथील ॲड.राजु भुरेवाल, भैय्यालाल कडपे, देवचंद विजयसेनानी, चंदुभैय्या जांगडे, रमण भगत, गणेश बटावाले, इंजि.गोपाल भुरेवाले, सुबोध विजयसेनानी, राजु रुपा पहेलवान खरे, रविंद्र चुन्नीलाल नंद, देविलाल भोपनलाल भगत, लालचंद भगत, श्रावण भुरेवाले , संजय भगत, विजय जटावाले,संतोश जांगडे,मेघराज भुरेवाल, राजेश काबलिये,शरद विजयसेनानी,विशाल जांगडे,रोहित गौरक्षक,रितेश भुरेवाले,अमरदीप झाडीवाले, गणेश बटावाले, किशोर भुरेवाल, राहुल बरेटीये, गंगालाल भगत,लालु गोमतीवाले, सुदर्शन चौधरी, लालचंद शेंडीवाले,कविता धन्नुलाल झाडीवाले,रेणुका गौरक्षक, सौ. भारती चंपालाल भगत, सौ. भारती दिनेश नंद, सौ. चंदाबाई गणेशलाल बटावाले, सौ. ज्योती दिनेश नंद, सौ. मिना नंदलाल झाडीवाले,सौ. राजेश्री फतेलष्करी, सौ. कविता खाकीवाले,सौ.भाग्यश्री



पहाडीये, चेतन जांगडे, सुनिल बागवाले, रामेश्वर मेघावाले, किशोर तुलसीबागवाले, श्रावण पहाडीये, मयुर खुनीवाले,

या संमेलनाला यशस्वी करण्यासाठी समितीचे अध्यक्ष धन्नुलाल झाडीवाले, समिती के उपाध्यक्ष : नितीन जांगडे,राजु भगत, मदन भुरेवाल,अशोक भगत,अनिलसेट भुरेवाले, सुबोध विजयसेनानी,गणेश बटावाले,अमृत चौधरी, नरेश चुन्नीलाल नंद,मोहनलाल झाडीवाले, दिनेश भगत,नंदलाल शेंडीवाले,हेमराज शेंडीवाले, संतोष काबलिये,पवन जांगडे, राधेश्याम झाडीवाले, रथीलाल भगत, सुनिल भगत,दिनेश भुरेवाल,शिवराज नारियलवाले, तुलसीराम विजयसेनानी, कन्हैय्यालाल वस्ताद भगत, सेवक नारियलवाले, मदन भुरेवाल, सुनिल गंगाराम चौधरी, संतोष काबलीये, गोपाल भुरेवाल, गणेश बटावाले, गणेश जफ्राबादी, सुरेश गोमतीवाले, भोलाराम भुरेवाल, मेघराज भगत, कपील चौधरी, नरेश खाकीवाले, बदीनारायण भुरेवाल, नरेश चौधरी, ब्रम्हानंद जांगडे, उमेश विजयसेनानी, बबनलाल भगत, देविभैय्या भगत, रोहित गौरक्षक, नंदलाल जटावाले, नंदलाल शेंडीवाले, संजय खरे, समर्पण विजयसेनानी, राम भुरेवाल, दिनेश भुरेवाल, सुरेश कडपेवाले, सोनु नंद, शुभम गौरक्षक, अर्जुन गौरक्षक, संदीप बटावाले, सुनिल भुरेवाल, सचिन नरियलवाले, देवेंद्र भगत, हरेश भगत, नरेंद भगत, अमर झाडीवाले, गणेश गोमतीवाले, सोनु चौधरी, सहसचिव : मदनलाल नारियलवाले,सावरीया हिरालाल भगत,प्रभुलाल जांगडे,संतोश जांगडे, सचिव : कपिल चौधरी, ॲड सुश्त विजयसेनानी, भावेष जांगडे, योगेश भगत, वैभव दिपवाल, सतपाल काठोठीवाले, कपिल भुरेवाले, भग्गु भगत, कुंदन गोमतीवाले, हरेश भगत, भुषण यादव,राहुल भगत, किशोर भुरेवाल, जिवन भगत, पंकज खाकीवाले, पंकज खरे, सागर बटावाले, गोपी जटावाले, गोपाल भुरेवाल, अर्जुन बटावाले, विष्णु बटावाले, अमरचंद देवावाले, दिनेश चुन्नीलालजी नंद, अभय यादव, अभिमन्यु काबलीये, योगेश भगत, महिला अध्यक्ष सौ. ॲड.शोभा शरद विजयसेनानी, महिला कार्याध्यक्ष सौ.स्नेहा सुनिल खरे, उपाध्यक्ष श्रीमती अनिता धन्नुलाल भगत, सौ कमलाबाई रतनलाल गोमतीवाले, श्रीमती मनिषा विजयसेनानी, सौ. भारती शिवदत्त विजयसेनानी, श्रीमती सविताबाई गुरखुदे, सौ. शोभाबाई नेमीचंद भुरेवाल, सौ. गोदाबाई भोपनलाल शेंडीवाले, सौ.मिराबाई काबलीये, सौ. ज्योतीबाई लालचंद भगत, सौ. संगिताबाई मदनलाल भगत, श्रीमती अनिता रुपचंद नंद, सौ. मायाबाई गणेश झाडीवाले, सौ.कोकीलाबाई गौरक्षक यांचे हातभार लाभले. या संमेलनात अहिर गवळी समाजाचे बंधु-भगिनी व मातृशक्तिची उपस्थितीत सामुहिक विवाह पार पडले व ४७ जोडपे विवाह बंधनात अडकले. या कार्यक्रमाचे सुत्रसंचलन विनोद यादव, दुर्गेश काठोठीवाले यांनी केले तर आभार प्रदर्शन व मुख्य संयोजक सुनिल रुपा पहेलवान खरे यांनी मानले.

# परतुरच्या राहुल काळे याची राष्ट्रीय सिलंबम स्पर्धेत निवड

**परतूर । प्रतिनिधी -** आगामी १,२ आणि ३ मे २०२६ रोजी जालना येथे होणाऱ्या राष्ट्रीय सिलंबम स्पर्धा तसेच आंतरराष्ट्रीय निवड चाचणीसाठी परतुरच्या सिलंबम खेळाडू राहुल विश्वनाथ काळे याची निवड झाली आहे.



जालना जिल्हा सिलंबम स्पोर्ट्स असोसिएशन शाखा परतुरचे कोच रोहित माणिक जैस्वाल. यांच्या मार्गदर्शनाखाली राहुल काळे यानी उत्कृष्ट सराव व मेहनतीच्या जोरावर जालना जिल्हा संघात आपले स्थान निश्चित केले आहे.

राहुल याच्या निवडीमुळे परतुर तालुक्यात आनंदाचे वातावरण असून, खेळाडू, पालक व क्रीडाप्रेमींनी त्यांचे अभिनंदन केले आहे. आगामी राष्ट्रीय स्पर्धेत राहुल उत्कृष्ट कामगिरी करून जिल्ह्याचे नाव उज्ज्वल करील, असा विश्वास व्यक्त करण्यात येत आहे.

# २३ कोटींच्या अपहारप्रकरणी राजेंद्र टोकशा ताब्यात

## आर्थिक गुन्हे शाखेची धडाकेबाज कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** जालना शहरात खळबळ उडवून देणाऱ्या जालना मर्चंट को-ऑपरेटिव्ह बँक घोटाळ्यात आता एक मोठी आणि धक्कादायक माहिती समोर आली आहे. ज्या व्यक्तीने या घोटाळ्याची तक्रार दिली, तोच या गुन्ह्यातील मुख्य सूत्रधार असल्याचे तपासात निष्पन्न झाले असून, आर्थिक गुन्हे शाखेने बँकेचे महाव्यवस्थापक राजेंद्र भिकचंद टोकशा यांना अटक केली आहे. या कारवाईमुळे बँकिंग क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे.

जालना मर्चंट बँकेत बनावट कागदपत्रांच्या आधारे वेअर हाऊसच्या नावाने १७७ बनावट खातेदार तयार करण्यात आले होते. या खात्यांच्या माध्यमातून तब्बल **२३ कोटी ३३ लाख रुपयांची** मोठी फसवणूक करण्यात आली. याप्रकरणी चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा (गु.र.नं. २२०/२०२६) दाखल करण्यात आला होता. अपहाराची रक्कम मोठी असल्याने पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल यांनी या प्रकरणाचा तपास आर्थिक गुन्हे शाखेकडे सोपवला होता.

सुरुवातीला या गुन्ह्याचा मुख्य सूत्रधार रायचंद सखाराम कुरंगळ याला अटक करण्यात आली होती. त्यानंतर नीलेश्वर भोसले, रामेश्वर जाधव, ज्ञानेश्वर जाधव आणि सुधाकर ठोंबरे यांनाही गजाआड करण्यात आले. मात्र, आर्थिक गुन्हे शाखेने जेव्हा सखोल तपास केला आणि बँकेच्या अधिकाऱ्यांची चौकशी केली, तेव्हा धक्कादायक पुरावे समोर आले.

बँकेचे महाव्यवस्थापक आणि या प्रकरणातील फिर्यादी राजेंद्र टोकशा यांचाही या संपूर्ण कटात सहभाग असल्याचे पुराव्यांवरून स्पष्ट झाले. ज्याने तक्रार दिली, तोच आरोपींसोबत संगनमत करून बँकेला चुना लावत होता, हे स्पष्ट होताच पोलिसांनी शुक्रवारी त्यांना अटक केली. न्यायालयाने टोकशा यांना सोमवारपर्यंत पोलीस कोठडी सुनावली आहे.

या घोटाळ्यात केवळ टोकशा आणि कुरंगळच नाहीत, तर इतरही काही बड्या नावांचा समावेश असण्याची दाट शक्यता वर्तवली जात आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, चौकशीमध्ये अजूनही काही नावे समोर येऊ शकतात.

पोलीस अधीक्षक अजयकुमार बन्सल अपर पोलीस अधीक्षक आयुष नोपाणी, आर्थिक गुन्हे शाखेचे प्रभारी पोलीस उपाध्यक्ष सुरेश उनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली सहायक पोलीस निरीक्षक मिथुन घुगे, शैलेश म्हस्के आणि शाखेतील पोलीस आमदार गोकुळ सिंग कायटे, समाधान तेलंग, किरण चव्हाण, अंबादास साबळे, गजू भोसले, विष्णू कोरडे, ज्ञानेश्वर फ ुले, रवींद्र गायकवाड, श्रेयस वाघमारे, चालक पाठक मेजर, महिला आमदार जयश्री निकम, मंदा नाटकर त्यांच्या पथकाने ही धाडसी कारवाई केली आहे.

# भीषण आगीत वडील मुलाचा मृत्यू

## आ. बबनराव लोणीकर यांचा तातडीने मदतीसाठी पुढाकार

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर शहरातील जईद गल्ली परिसरात घडलेल्या भीषण आगीच्या दुर्घटनेत पंडितराव हरिभाऊ जईद व त्यांचा मुलगा कृष्णा पंडितराव जईद यांचा जागीच दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना समोर आली आहे. या हृदयद्रावक घटनेमुळे संपूर्ण परिसरात शोककळा पसरली आहे. प्राथमिक माहितीनुसार, आग लागल्यावेळी घरात उपस्थित असलेल्या दोघांचा बचाव होऊ शकला नाही. सुदैवाने पंडितराव जईद यांच्या पत्नी पार्वतीबाई जईद या त्यावेळी बाहेर गेल्यामुळे त्यांचे प्राण वाचले.

घटनेची माहिती मिळताच माजी मंत्री तथा विद्यमान आमदार बबनराव लोणीकर यांनी तात्काळ प्रशासनाशी संपर्क साधून परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांनी आरडीसी हदगल तसेच उपविभागीय अधिकारी पद्माकर गायकवाड यांच्याशी दूरध्वनीवरून चर्चा करत, पीडित कुटुंबाला शासनाकडून तातडीने मदत मिळावी यासाठी आवश्यक त्या सूचना केल्या.

तसेच, घटनेची गंभीर दखल घेत प्रशासनाकडून मदत प्रक्रिया सुरू करण्याच्या दृष्टीने हालचाली वेगाने सुरू झाल्याची माहिती मिळत आहे. संबंधित यंत्रणांकडून घटनेचा सविस्तर तपास सुरू असून, नुकसानाचे पंचनामे व मदतीचे प्रस्ताव सादर करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# पनीरच्या नावाखाली ॲनालॉगचा वापर आढळल्यास आता थेट कारवाई

**जालना । प्रतिनिधी -** हॉटेलमध्ये चवीने पनीर टिक्का किंवा पनीर बटर मसालाच्या डिशमध्ये तुम्ही नक्की काय खाताय, याचा आता गांभीर्याने विचार करण्याची वेळ आली आहे. पनीरच्या नावाखाली स्वस्त दरातील चीज ॲनालॉगचा वापर करून ग्राहकांची फसवणूक करणाऱ्या रेस्टॉरंट आणि हॉटेल चालकांविरुद्ध अन्न व औषध प्रशासनाने आता कडक पावले उचलली आहेत. ॲनालॉगचा वापर आढळल्यास थेट कारवाई करण्याचे निर्देश अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त श्रीधर डुबे पाटील यांनी दिले आहेत.

शाकाहारी खवय्यांसाठी पनीर हा प्रथिनांचा मुख्य स्रोत मानला जातो. मात्र, वाढत्या नफेखोरीसाठी काही व्यावसायिक दुधापासून बनवलेल्या अस्सल पनीरऐवजी खाद्यतेल, स्टार्च आणि इमल्सिफायर वापरून तयार केलेले ॲनालॉग ग्राहकांच्या ताटात वाढत आहेत. हे दिसायला पनीरसारखेच असले तरी त्याचे पोषणमूल्य दुधाच्या पनीरपेक्षा पूर्णपणे वेगळे असते. अनेक हॉटेल्समध्ये ग्राहकांना कोणतीही पूर्वकल्पना न देता हे स्वस्त पर्याय वापरले जात आहेत. यावर प्रतिबंध लावण्यासाठी प्रशासनाने आता नवे नियम लागू केले आहेत. यामध्ये जर हॉटेलमध्ये ॲनालॉग वापरले जात असेल, तर त्याचा स्पष्ट उल्लेख मेन्यूकार्ड किंवा डिस्प्ले बोर्डवर करावा लागेल. विक्री बिलावर केवळ पनीर न लिहिता डेअरी ॲनालॉग असा स्पष्ट उल्लेख करणे आता बंधनकारक आहे. सर्व अन्न व्यावसायिकांनी त्यांच्या ऑनलाइन परवाना अर्जामध्ये स्वतःचा ई-मेल आयडी आणि मोबाईल क्रमांक तात्काळ अपडेट करण्याचे आदेशही देण्यात आले आहेत. नागरिकांनी पॅक बंद पनीर खरेदी करताना त्यावरील घटक नीट वाचून खात्री करा. सुटे पनीर घेताना ते शुद्ध दुधाचे असल्याची खात्री करा आणि संशय आल्यास पक्के बिल मागायला विसरू नका. ऑर्डर देण्यापूर्वी हॉटेलमध्ये पनीर आणि ॲनालॉग असे स्वतंत्र पर्याय आहेत का, याची विचारणा करावी. जर आपली फसवणूक होत असल्याचे लक्षात आले, तर ग्राहकांनी तात्काळ अन्न व औषध प्रशासन विभागाकडे तक्रार नोंदवावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासनाचे सहायक आयुक्त निखिल कुलकर्णी यांनी केले आहे.

हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282
Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886
E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.